विशेष लेख क्रमांक २५९ १६ भाद्रपद १९२८ शके (सायं.५.३० वा.)
गुरुवार, दि. ७ सप्टेंबर २००६

**मौलाना आझाद अल्पसंख्यांक विकास**
**महामंडळाच्या योजना**

**राज्य शासनाने समाजातील वेगवेगळया वर्गाच्या कल्याणासाठी विविध महामंडळाची स्थापना केली असून महामंडळाच्या योजनातून समाजातील वेगवेगळे घटक आपला विकास साधत आहेत. त्याचप्रमाणे अल्पसंख्यांक समाजातील सामाजिक व आर्थिकदृष्टया मागासलेल्या युवक , युवतींना आर्थिक सहाय्य करण्याच्या दृष्टीने राज्यशासनाने २८ सप्टेंबर २००० रोजी मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली आहे. या महामंडळाच्या माध्यमातून राज्य शासन वेगवेगळे उपक्रम राबवत असते. नंदुरबार जिल्हयातून दोन लाभार्थ्यांना प्रत्येकी ७५ हजार रु. कर्ज मंजूर करण्यात आले असून त्यात अल्ताफ हुसेन अब्दुल मुनाफ पिंजारी यांना फळ विक्री व अब्दुल मुजीब अब्दुल वहाब यांना प्लास्टीक सामान खरेदी विक्रीसाठी ६ टक्के व्याजाने कर्ज मंजूर केले आहे. यामुळे दोन कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटला आहे. या महामंडळाचा जास्तीतजास्त लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा असे जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राच्या वतीने आवाहन केले असून या महामंडळाविषयी थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे..**

**थेट कर्ज योजना**

अल्पसंख्यांक समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींना रुपये ५ हजार ते रु. ५० हजारापर्यंत कर्ज दिले जाते. अर्जदार मुस्लीम ख्रिश्चन, बौध्द, पारशी, शिख आणि जैन समाजाचा व १८ ते ४५ वयोगटातील असावा. शैक्षणिक पात्रता किमान ४ थी पास असावा. अर्जदाराच्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न शहरी भागामध्ये राहणारा असल्यास रुपये ५४ हजार ५०० व ग्रामीण भागामध्ये राहणा-यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रुपये ३९ हजार, ५०० इतके असावे, एकुण कर्ज **रकमेपैकी ५ टक्के** स्वत: उभारावी लागेल. परतफेड पाच वर्षामध्ये २० त्रैमासिक हप्त्यात मुद्दल व व्याज मिळून होईल कर्जासाठी दोन सक्षम जामीनदार द्यावे लागतील. व्याज दर ६ टक्के राहील. कर्जदारास कर्ज वितरणापूर्वी आवश्यक ती वैधानिक कागदपत्रे, करारनामे सादर करावे लागतील.

**मुदत कर्ज योजना :-** अल्पसंख्यांक समाजातील सुशिक्षित बेरोजगार असलेल्या १८ ते ४५ वयोगटातील युवक युवतींना रुपये ५ हजार ते ५ लाखापर्यंत कर्ज देता येईल. राष्ट्रीय अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या प्रकल्प निकषानुसार कर्ज मंजूर केले जाईल. एकूण रकमेपैकी ८५ टक्के रक्कम राष्ट्रीय अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, नवी दिल्ली यांची व १० टक्के रक्कम मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मुंबई यांची असेल. अर्जदारास ५ टक्के रक्कम उभारावी लागेल. ग्रामीण भागात राहणा-या अर्जदारांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रुपये ३९ हजार ५०० आणि शहरी भागांसाठी रुपये ५४ हजार ५०० असावे. ६ टक्के दराने व्याज आकारले जाईल. कर्जाची परतफेड पांच वर्षामध्ये मुद्दल व व्याज धरुन २० त्रैमासिक हप्त्यात होईल. कर्जासाठी दोन सक्षम जामीनदार द्यावे लागतील. कर्जदारास कर्ज वितरणापूर्वी आवश्यक ती वैधानिक कागदपत्रे करारनामे इ. सादर करावे लागतील.

...२/

**बीज भांडवल कर्ज योजना :-** या योजनेअंतर्गत १८ ते ४५ वर्षाच्या आतील अल्पसंख्यांक युवक युवतींना कर्ज मिळेल. अर्जदार शहरी भागात राहात असल्यास त्याचे कौटुंबिक उत्पन्न रुपये ५४ हजार ५०० च्या आंत असावे. तसेच ग्रामीण भागात राहात असल्यास त्याचे कौटुंबिक उत्पन्न रुपये ३९ हजार ५०० च्या आंत असावे. रुपये ५ हजार ते रुपये ५ लाखापर्यत कर्ज घेता येईल. त्यापैकी ६० टक्के बँकेचा हिस्सा, ३५ टक्के महामंडळाचा हिस्सा व उर्वरित ५ टक्के रक्कम उमेदवारांनी स्वतः उभारावयाची आहे. बॅकेच्या कर्ज रकमेवर बँकेच्या प्रचलित अटींनुसार व्याज द्यावे लागेल. महामंडळाच्या कर्ज रकमेवर ६ टक्के. व्याज आकारण्यात येईल. कर्जाची परतफेड ५ वर्षात, २० त्रैमासिक हप्त्यांमध्ये होईल. कर्जासाठी दोन सक्षम जामीनदारांची हमी द्यावी लागेल.

**शैक्षणिक कर्ज योजना**

या योजनेतंर्गत १६ वर्ष ते ३२ वर्ष वयोगटातील अल्पसंख्याक समाजांमधील तरुण तरुणींना टेक्निकल प्रोफेशनल अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी द.सा. द. शे. ३ टक्के दराने अभ्यासक्रमाच्या पूर्ण कालावधीसाठी जास्तीतजास्त रुपये २ लाख ५० हजार एवढे कर्ज उपलब्ध होऊ शकते. सदरचे कर्ज गुणवत्तेनुसार दिले जाते. कर्जाची परतफेड अभ्यासक्रम पूर्ण झाल्यापासून ६ महिन्यानंतर अथवा नोकरी लागेपर्यंत यापैकी जे आधी घडेल तेंव्हापासून सुरु होऊन ३ वर्षामध्ये परतफेड करणे आवश्यक आहे.

**व्यवसाय प्रशिक्षण योजना**

सदर योजना राष्ट्रीय अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ नवी दिल्ली यांच्या सहाय्याने राबविण्यात येत असून, सदर योजनेअंतर्गत किमान ७ वी इयत्तेपर्यंत शिक्षण झालेल्या १६ ते ३२ वर्षे वयोगटातील तरुण तरुणींना व्यावसायाभिमुख प्रशिक्षण मोफत दिले जाते.

**कर्ज प्रकरणांमध्ये अर्जदारांची पात्रता :-** अर्जदार मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, बौध्द, पारशी या अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील असावा थेट कर्ज योजनेखाली जैन समाजातील अर्जदारांचा देखील समावेश राहील. अर्जदार महाराष्ट्रातील रहिवासी व किमान इयत्ता ४ थी पास असावा, अर्जदाराचे वय १८ ते ४५ वर्ष असावे. तसेच कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ,शहरी भागांमध्ये रुपये ५४ हजार ५०० हून कमी तर ग्रामीण क्षेत्रातील असल्यास वार्षिक उत्पन्न रुपये ३९ हजार ५०० हून कमी असावे.

**कर्ज प्रकरण करण्याची पध्दत :-** कर्ज मागणीसाठीचे अर्ज सर्व जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केद्रांमध्ये रुपये ५ इतके शुल्क भरुन उपलब्ध होतील. अर्जदारांनी अर्ज भरुन तीन प्रतीत सर्व कागदपत्रांसह आपल्या जिल्हयामधील जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये सादर करावेत. लाभार्थ्यांनी अधिक माहितीसाठी जिल्हयातील सर्व सहाय्यक संचालक / जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र येथे संपर्क साधावा.

**जगन्नाथ पाटील**
जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार

-----------------